**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक ०३ डिसेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

- **जगण्याप्रती सकारात्मक राहण्याच्या दिव्यांग व्यक्तींच्या दृष्टिकोनामुळे समाजाला प्रेरणा मिळत असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन; सुगम्य भारत अभियानाला ९ वर्षं पूर्ण.**
- **नवीन फौजदारी कायद्यांमुळे वसाहतवादाच्या मानसिक गुलामगिरीतून भारतीयांना मुक्ती मिळाल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.**
- **संसदेच्या हिवाळी अधिवेशनात आज विविध मुद्यांवरून निदर्शनं करत लोकसभेत विरोधी पक्षांच्या सदस्यांचा सभात्याग.**
- **शेतीचा विकास झाला नाही, तर २०४७ मध्ये विकसित भारताचं ध्येय पूर्ण होणार नाही-उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचं मुंबईत प्रतिपादन.**

सुगम्य भारत/राष्ट्रपती

अनेक अडचणी असताना सुद्धा जगण्याप्रती सकारात्मक राहण्याच्या दिव्यांग व्यक्तींच्या दृष्टिकोनामुळे मला आणि समाजाला प्रेरणा मिळते, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. आंतरराष्ट्रीय दिव्यांग जन दिनानिमित्त नवी दिल्ली इथं आयोजित दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठीचे राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केल्यानंतर त्या बोलत होत्या. यावेळी एकूण २२ व्यक्ती आणि ११ संस्थांना राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आले. या पुरस्कार विजेत्यांमध्ये महाराष्ट्रातले प्रियांका दाभाडे, कनिका अग्रवाल, प्रथमेश सिन्हा या तिघांचा तसंच सेंट झेवियर्स महाविद्यालयाचा समावेश आहे. पुरस्कार वितरणानंतर आपल्या संबोधनात राष्ट्रपती म्हणाल्या -

***सही मायने में उसी समाज को संवेदनशील कहा जा सकता है, जिसमें दिव्यांगों को समान सुविधा तथा अवसर प्राप्त होते है । इसी सोच के साथ सुज़ंम भारत के निर्माण राष्ट्र लक्ष तय किया गया है। सुज़ंम भारत अभियान के लिए सभी मंत्रलाय और विभाग मिलकर WHOLE OF THE GOVT. APPROCH के साथ काम कर रहे है. ग्रामीण क्षेत्र और दुर दराज के इलाको में रहने***

***वाले दिव्यांगजनों के कल्याण और विकास के लिए विशेष प्रयास करने की आवश्यकता है.***

आज सुगम्य भारत अभियानाचा 9 वा वर्धापन दिन आहे. दिव्यांगजनांसाठी सुलभ आणि सर्वसमावेशक सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी, दिव्यांगांच सक्षमीकरण करून त्यांच्यासाठी सन्मानाच जीवन सुनिश्चित करण्यासाठी दिव्यांग सशक्तीकरण विभागानं सुरू केलेल्या सुगम्य भारत अभियानाला आज ९ वर्षं पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त देशभर विविध उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री डॉ.वीरेंद्र कुमार यांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी अनेक कल्याणकारी उपक्रमांचा शुभारंभ देखील आज करण्यात आला. यामध्ये ब्रेल लिपीतल्या पुस्तकांच्या पोर्टलचा समावेश आहे.

पंतप्रधान मोदी/ नवीन कायदे

नवीन फौजदारी कायद्यांमुळे ब्रिटीश वसाहतवादाच्या मानसिक गुलामगिरीतून भारतीयांना मुक्ती मिळाल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीचं लोकार्पण केल्यानंतर आज हरियाणात चंडीगढ इथं ते बोलत होते. या नवीन कायद्यांची संहिता तयार करणं अवघड आणि अभ्यासपूर्ण होतं असं ते म्हणाले. या कायद्यांच्या यशस्वी अंमलबजावणी निमित्त मोदी यांनी नागरिकांचं अभिनंदन केलं. नवीन कायदे हे संविधानान नागरिकांना दिलेल्या अधिकारांचं रक्षण करण्यासाठी उचललेलं ठोस पाऊल असल्याचं ते म्हणाले.....

***एक ऐसे समय में जब देश विकसित भारत का संकल्प लेकर आगे बढ़ रहा है, जब संविधान के ७५ वर्ष हो रहे है, तब संविधान के भावना से प्रेरित भारतीय न्याय संहिता का प्रभाव प्रारंभ होना, उसका प्रभाव में आना एक बहोत बड़ी शुरवात है. देश के नागरिकों के लिए हमारे संविधान में जिन आदर्शों की कल्पना की उन्हें पूरा करने की दिशा में ये ठोस प्रयास है।***

भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष्य अधिनियम या तीन नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीला यावर्षी १ जुलैपासून सुरूवात करण्यात आली आहे.

संसद

एका खाजगी उद्योग समूहाचं कथित लाचखोरी प्रकरण, संभल हिंसाचार आणि इतर मुद्यांवरून निदर्शनं करत लोकसभेत विरोधी पक्षांच्या सदस्यांनी आज सभात्याग केला. सभागृहाचं कामकाज सुरू झाल्यानंतर विरोधी पक्षांच्या सदस्यांनी या मुद्यावर प्रश्न विचारायला सुरुवात केली. मात्र हे मुद्दे शून्य प्रहरात उपस्थित करावेत, असं लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी त्यांना सांगितलं. त्यामुळे कॉँग्रेस, समाजवादी पार्टी, द्रमुक आणि इतर पक्षाच्या खासदारांनी गदारोळ करत सभात्याग केला. राज्यसभेतही समाजवादी पार्टीचे खासदार रामगोपाल यादव यांनी संभल हिंसाचारप्रकरणी प्रश्न उपस्थित केला. त्यानंतर समाजवादी पार्टी आणि तृणमूल कॉँग्रेसच्या खासदारांनी सभात्याग केला. दरम्यान, मनरेगा अर्थात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या निधीत गेल्या दहा वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. चालू आर्थिक वर्षात सरकारनं मनरेगासाठी अर्थसंकल्पात ८७ हजार कोटी रुपयांची तरतूद केली, अशी माहिती ग्रामविकास राज्यमंत्री डॉक्टर चंद्रशेखर पेम्मासनी यांनी लोकसभेत एका लेखी प्रश्नाला उत्तर देताना दिली. कोविड महामारीच्या काळात मनरेगासाठी एक लाख दहा हजार कोटी रुपये खर्च करण्यात आला. गेल्या पाच वर्षात मजुरीतही ४३ टक्क्यांनी वाढ झाल्याचं चंद्रशेखर यांनी सांगितलं.

राज्यपाल

भारतात सन २०५० पर्यंत लहान मुलांची संख्या जगात सर्वाधिक, म्हणजे अंदाजे ३५ कोटी असेल. यादृष्टीन राज्यांनी आरोग्य सेवा, शिक्षण आणि  कौशल्य प्रशिक्षण तसंच  नोकरीच्या समन्यायी संधी निर्माण करणे आणि  तंत्रज्ञान उपलब्धतेतील तफावत कमी करण गरजेच असून या क्षेत्रात अधिक गुंतवणूकीवर भर द्यावा, असं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं. राज्यपाल राधाकृष्णन यांच्या हस्ते युनिसेफच्या 'स्टेट ऑफ द वर्ल्ड्स चिल्ड्रन रिपोर्ट-२०२४:बदलत्या विश्वात लहान मुलांचे भवितव्य' या विषयावरील अहवालाचं प्रकाशन आज राजभवनात करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते.

## शपथविधी तयारी आढावा

मुंबईच्या आझाद मैदान इथं ५ डिसेम्बर रोजी होणाऱ्या राज्याच्या नवं निर्वाचित सरकारच्या शपथविधी सोहळ्याचा भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज आढावा घेतला. या शपथ विधीसाठी एनडीए शासित राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना निमंत्रण देण्यात आलं आहे. त्याचप्रमाणे केंद्रीय मंत्री आणि अनेक राज्यांचे राज्यपाल देखील उपस्थित राहणार आहेत.

## उपराष्ट्रपती जगदीप धनखड

सरकारनं शेतकऱ्यांसोबत सतत संवाद सुरू ठेवावा, त्यांना दिलेली आश्वासन पाळावी आणि शेतकऱ्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याकडे चोख लक्ष द्यावं अशा सूचना देतानाच शेतकऱ्यांना जितकं सहकार्य केलं जाईल त्याच्या पाचपट परतावा देशाला मिळेल असा विश्वास उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी व्यक्त केला. मुंबई मधील केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या महोत्सवी समारंभाला ते प्रमुख अतिथी म्हणून संबोधित करीत होते. यावेळी उपराष्ट्रपतींच्या हस्ते शतक महोत्सवी स्तंभाचं उद्घाटन देखील करण्यात आलं. संस्थेच्या शतक महोत्सवी वर्षाच औचित्य साधून 'अमृतकाळात कापसावरची उत्पादनानंतरची प्रक्रिया' या विषयावरच्या परिसंवादाचं आयोजन करण्यात आलं होतं. धनखड पुढं म्हणाले की सरकारच्या काही चुकीच्या धोरणांमुळे शेतकरी आंदोलन करत असतील तर त्यावर फेरविचार व्हायला हवा. कारण शेतीचा विकास झाला नाही, तर २०४७ मध्ये विकसित भारताचं ध्येय पूर्ण होणार नाही. शेतकरी भारतमातेचं हृदय आहे. शेतकऱ्यांना आणि ग्रामीण भारताला न्याय देण्यासाठी प्राध्यान्य द्यायला हवं असं आवाहन धनखड यांनी केलं.

## महापरिनिर्वाण दिन

परवा सहा डिसेंबरला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६८ वा महापरिनिर्वाण दिन आहे. या निमित्त, मुंबईत चैत्यभूमी इथं येणारी अनुयायांची संख्या पाहता, मध्य रेल्वेतर्फे विशेष नियोजन करण्यात आलं आहे. रेल्वे पोलीस दल आणि रेल्वेच्या व्यावसायिक विभागाकडून, दादर आणि नजीकच्या रेल्वे स्थानकांवर, अतिरिक्त १०० रेल्वे पोलीसांची नियुक्ती केली जाणार आहे. या पोलिसांमार्फत, प्रवाशांना मदत केली जाईल. रेल्वे स्थानकांवर- मदत कक्षही उभारण्यात येणार आहे.

इंडिया अगेन्स्ट करप्शन

राज्यातील मतदारांनी स्पष्ट कौल दिल्यानंतर महायुतीतील तिन्ही पक्षांच्या जबाबदारीत वाढ झाली आहे. विकासाच्या अनुषंगान आता राज्याच्या डोक्यावर असलेल्या कर्जाचे डोंगर कमी करण्यासाठी नवीन सरकारला योग्य धोरण आखण्याची गरज असल्याचं  मत इंडिया अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष, ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी व्यक्त केलं आहे. महाराष्ट्राचा जीडीपी ४२ लाख कोटींवर गेला आहे.पंरतु, कर्जाचा बोजा मोठ्या प्रमाणात वाढत आहे. २०१४ मध्ये राज्याच्या कर्जाच प्रमाण १६ टक्के होत. पंरतु, आता हे प्रमाण १८ पूर्णांक ३५ टक्कांवर पोहोचलं आहे.  कर्जाची रक्कम अशीच वाढत राहिली तर भविष्यात कर्ज मिळण्यास अडचणी उद्भवतील अशी भीती पाटील यांनी व्यक्त केली आहे.

हवामान

हवामान: गेल्या 24 तासात विदर्भात सर्वात कमी किमान तापमान चंद्रपूर जिल्ह्यात 17 अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आल आहे. त्या पाठोपाठ गडचिरोली जिल्ह्यात 18 पूर्णांक ४ तर भंडारा येथे 19 अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे.  नागपुरात गेल्या 24 तासात 21 पूर्णांक 4 अंश सेल्सिअस इतक किमान तापमान नोंदवण्यात आलं असून किमान तापमानातली वाढ ही फेंगल चक्रीवादळाच्या प्रभावामुळे असल्याचं हवामान विभागान म्हटलं आहे. येत्या पाच तारखेला गडचिरोली जिल्ह्यात पावसाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागान वर्तवली आहे.

******